# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## प्रेसनोट

# ‘पीएमपीएमएल’ च्या पुणे दर्शन व पर्यटन बस सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद

- **माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये उत्पन्नात वाढ.**

प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी व रविवारी विविध कार्यालये, कॉलेज, शाळा, औद्योगिक क्षेत्रातील व आयटी क्षेत्रातील कंपन्यांमधील नोकरदारांना साप्ताहिक सुट्टी असल्याने प्रवाशांचा प्रतिसाद जास्त असतो. सदरील प्रवाशांचा प्रवास आरामदायी, सुलभ व माफक दरात होणेच्या दृष्टीने तसेच हौशी पर्यटक, भाविक-भक्त यांना धार्मिक व पर्यटन स्थळांना भेट देणेसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून ‘पुणे दर्शन’ व ‘पर्यटन बस’ सेवा वातानुकूलीत ई-बसेसव्दारे प्रत्येक आठवड्याच्या शनिवार, रविवार, सार्वजनिक सुट्टी व इतर दिवशी बस सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. १५ ते २० प्रवाशी यांनी बुकिंग केल्यास कोणत्याही दिवशी बस सोडण्यात येते.

सदर बस सेवेला माहे नोव्हेंबर २०२४ महिन्यात उत्स्फूर्त प्रतीसाद मिळाला असून उत्पन्नात वाढ झाली आहे.

**‘पुणे दर्शन’ व ‘पर्यटन बस’ सेवेचे माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ उत्पन्न पुढीलप्रमाणे .**

| अ.क्र | महिना | पुणे दर्शन उत्पन्न रु. | पर्यटन बस उत्पन्न रु. | एकूण उत्पन्न रु. |
|---|---|---|---|---|
| १. | ऑक्टोबर २०२४ | ३७,०००/- | ८९,०००/- | १,२६,०००/- |
| २. | नोव्हेंबर २०२४ | १,६१,०००/- | १,८८,०००/- | ३,४९,०००/- |

**पर्यटन बससेवेचे मार्ग व इतर माहिती खालीलप्रमाणे**

| अ.क्र | पर्यटन बस क्र. | मार्ग |
|---|---|---|
| १. | पर्यटन बससेवा क्र. १ | हडपसर, मोरगांव, जेजूरी, सासवड, हडपसर. |
| २. | पर्यटन बससेवा क्र. २ | हडपसर, सासवड सोपानकाका मंदिर, संगमेश्वर मंदिर, नारायणपूर, बालाजी मंदिर (केतकवळे), बनेश्वर मंदिर, कोंढणपूर मंदिर, हडपसर. |
| ३. | पर्यटन बससेवा क्र. ३ | डेक्कन, फ्रेंडशिप गार्डन, खारावडे म्हसोबा देवस्थान, निळकंठेश्वर पायथा, झपूर्झा संग्रहालय, डेक्कन. |
| ४. | पर्यटन बससेवा क्र. ४ | पुणे स्टेशन, खडकवासला धरण, पानशेत धरण, सिंहगड पायथा, पुणे स्टेशन. |
| ५. | पर्यटन बससेवा क्र. ५ | पुणे स्टेशन, पुलगेट, हडपसर, रामदरा, थेऊर गणपती, प्रयागधाम, हडपसर, पुणे स्टेशन. |
| ६. | पर्यटन बससेवा क्र. ६ | पुणे स्टेशन, वाघेश्वर मंदिर (वाघोली), वाडेबोल्हाई मंदिर, छ. संभाजी महाराज समाधी मंदिर (वढू बुद्रुक), रांजणगांव गणपती, भीमा कोरेगाव विजय रणस्तंभ, पुणे स्टेशन. |
| ७. | पर्यटन बससेवा क्र. ७ | भक्ती शक्ती निगडी, अप्पूघर, इस्कॉन मंदिर (रावेत), मोरया गोसावी मंदिर (चिंचवड), प्रतिशिर्डी (शिरगांव), देहूगांव, गाथा मंदिर, आळंदी, भक्ती शक्ती निगडी. |
| ८. | पर्यटन बससेवा क्र. ८ | पुणे स्टेशन-डेक्कन जिमखाना, राजीव गांधी प्राणी संग्रहालय, इस्कॉन मंदिर कोंढवा रोड, शिवसृष्टी आंबेगाव, स्वामी नारायण मंदिर नऱ्हे – आंबेगाव, पुणे स्टेशन. |

तरी मार्गशीर्ष महिन्यामध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पर्यटन बससेवेचा लाभ महिला, निसर्गप्रेमी, पर्यटक व भाविकांनी घ्यावा असे आवाहन करणेत येत आहे.

Sd/-

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

दि. ०६/१२/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.